**महाराष्ट्र शासन**

क्रमांक: बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२ A/१६- ब,
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक- २९ डिसेंबर, २०१७

**प्रति,**

अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
सर्व प्रशासकीय विभाग,
मंत्रालय, मुंबई.

**विषय:-** पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.२७९७/२०१५ वर दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पदोन्नती देण्यासंदर्भात मार्गदर्शनपर सूचना.

**संदर्भ :-** १) मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.२७९७/२०१५ संदर्भात दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेला निर्णय
२) शासनाची समक्रमांकाची दिनांक १८.१०.२०१७ व २.११.२०१७ ची पत्रे.

विषयांकित प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये, दिनांक २५.५.२००४ चा शासन निर्णय रद्द करुन पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. तथापि, मा.उच्च न्यायालयाने आपल्या दिनांक ४.८.२०१७ च्या निर्णयास १२ आठवडयाची स्थगिती दिली असल्यामुळे संदर्भाधिन क्र. २ येथील दिनांक १८.१०.२०१७ च्या पत्रान्वये सदर स्थगिती कालावधीत पदोन्नतीमध्ये आरक्षण देऊन पदोन्नती देण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले होते. हा स्थगिती कालावधी दिनांक २७.१०.२०१७ रोजी संपुष्टात आला आहे.

२. या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या उक्त निर्णयास स्थगिती देण्याच्या अनुषंगाने, मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६ /२०१७ संदर्भात दिनांक ३०.१०.२०१७ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ४.८.२०१७ च्या निर्णयास कोणतीही स्थगिती दिलेली नाही अथवा परिस्थिती “जैसे थे” ठेवण्याबाबत देखिल कोणतेही आदेश दिलेले नाहीत. त्यामुळे शासन निर्णय दि. २५.५.२००४ मधील तरतुदीनुसार मागासवर्गीयांना पदोन्नतीमध्ये आरक्षण देता येणार नाही. यास्तव, मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश होईपर्यंत सर्व स्तरावरील पदोन्नती प्रक्रिया स्थगित ठेवण्याबाबतच्या सुचना संदर्भाधिन दि.२.११.२०१७ च्या पत्रान्वये देण्यात आल्या होत्या.

३. सदर प्रकरणी दिनांक १५.११.२०१७ रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या दि.४.८.२०१७ च्या आदेशास स्थगिती देण्याबाबत अथवा परिस्थिती जैसे थे ठेवण्याबाबत कोणतेही आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे दि.२७.१०.२०१७ पासून राज्यातील सर्व स्तरावरील पदोन्नतीची प्रक्रीया पुर्णपणे ठप्प झाली आहे. मा.उच्च न्यायालयाने पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने सर्वच स्तरावरील पदोन्नतीची प्रक्रीया स्थगित न ठेवता, खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत विविध प्रशासकीय विभाग तसेच खुल्या प्रवर्गातील अधिकारी/कर्मचा-यांकडून शासनास निवेदने प्राप्त झाली आहेत.तसेच मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ अद्याप प्रलंबित आहे, ही बाब विचारात घेता, याबाबत विधि व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात आले. त्या विभागाने दि.२८.१२.२०१७ रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याचे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार तुर्तास पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत.अशी कार्यवाही करतांना सेवाजेष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापुर्वी ते , दि.२५.५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावी.

४. सर्व प्रशासकीय विभागांनी उपरोक्त आदेश त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांना तातडीने निदर्शनास आणून सदर आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.

५. सदर शासन पत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१७१२२९१४२१५२५८०७ असा आहे. हे पत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

Rasik Ambadas khadse

Digitally signed by Rasik Ambadas khadse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=46b7df2d2f9479d2bb9092a9859cf1644735a09d26dba77f04d38c1354b35457, cn=Rasik Ambadas khadse
Date: 2017.12.29 14:26:54 +05'30'

**(र.अं.खडसे)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) राज्यपाल यांचे सचिव,

२) मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव,

३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

४) विरोधी पक्ष नेता, विधानसभा व विधानपरिषद यांचे खाजगी सचिव

५) मुख्य सचिव,

६) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,

७) सर्व विभागीय आयुक्त,

८) सर्व सहायक आयुक्त मागास वर्ग कक्ष,कोकण विभाग,पुणे विभाग,नाशिक विभाग ,नागपूर विभाग,अमरावती विभाग,औरंगाबाद विभाग,

९) सर्व जिल्हाधिकारी,

१०) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

११) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,

१२) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,

१३) प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

१४) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

१५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,

१६) राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,

१७) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,

१८) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,

१९) संचालक, समाजकल्याण, पुणे,

२०) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,

२१) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,

२२) संचालक, सेवायोजन, मुंबई,

२३) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,

२४) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,

२५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

२६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,

२७) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,

२८) सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर पत्राची प्रत,त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

२९) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई

३०) निवड नस्ती, कार्यासन १६-ब.